पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचेकार्यालय,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिलकॉर्नर, छत्रपती संभाजीनगर
ई-मेल :- ps.crimebranch.abad@mahapolice.go

**Press Note** दिनांक - 11/09/2024

## " बनावट कागदपत्रांच्या आधारे बँक खाते व सिमकार्ड चा वापरून करून आर्थिक फसवणूक करणारे रॅकेट उघडकिस, तिघांना अटक."

| पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | फिर्यादी नांव व पत्ता |
|---|---|---|
| सायबर पोलीस ठाणे | 13/2024<br>कलम 316 (2), 318, 338, 336(3), 340(2),3(5) भारतीय न्याय संहिता 2023 सह 66 (D) भारतीय तंत्रज्ञान अधिनियम. | राजेंद्र आनंदराव बनसोडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, दहशतवाद विरोधी शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर |
| **गुन्हा घडला तारीख, वेळ व ठिकाण** | **गुन्हा दाखल तारीख व वेळ** | **माहिती कशी प्राप्त झाली** |
| दि.01/01/2022 ते 10/09/2024 पावेतो | दिनांक 11/09/2024 रोजी 05.44 वाजता | दहशतवाद विरोधी शाखा, छत्रपती संभाजीनगर यांना गोपनीय माहीती |

**आरोपीचे नांव व पत्ता**

1) उत्सवकुमार चंदुभाई भेसानिया वय 23 वर्ष रा. विश्वनगर सोसायटी, धावडा फाटा रोड, सुरत गुजरात
2) ऋषिकेश शिवनाथ भागवत वय 23 वर्ष रा. तेरणा हायस्कुल जवळ, सिंहगड कॉलनी, एन- 6 सिडको, अनुराग भाऊसाहेब घोडके वय 21 वर्ष रा. म्हसोबानगर जाधववाडी, छत्रपती संभाजीनगर

**गुन्हयाची हकीगत**

पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर अंतर्गत कार्यरत असलेल्या दहशतवाद विरोधी शाखा (ATB) यांना दिनांक 10/09/2024 रोजी गोपनिय माहिती मिळाली की, सुरत, गुजरात येथील एक इसम स्थानिक साथीदारांचे मदतीने, अनोळखी इसमांच्या आधारकार्ड, पॅनकार्ड इ. कागदपत्रांचा परस्पर वापर करुन त्या नावाने बँकेमध्ये खाते उघडतो व त्यासाठी दुस-याचे नावाचे वेगवेगळे सिमकार्ड वापरुन क्रिप्टो व युएसडीटी. सारख्या भारतात बंदी असलेल्या व्हर्च्युअल चलनाचे बेनामी व्यवहार करीत आहेत वगैरे.

मा.पोलीस आयुक्त श्री. प्रविण पवार यांचे मार्गदर्शनात गोपनीय माहीतीचे अनुषंगाने कारवाई करण्यासाठी दहशतवाद विरोधी शाखा, आर्थिक गुन्हे शाखा, सायबर पोलीस स्टेशन व छावणी वाहतुक शाखेतील अधिकारी व अंमलदार यांची चार वेगवेगळी पथके तयार करून दिनांक 10/09/2024 रोजी 22.00 वाजता निराला बाजार, छत्रपती संभाजीनगर येथील हॉटेलमध्ये छापा कारवाई करण्यात आली. छापा कारवाईमध्ये ताब्यात घेतलेल्या इसमांकडून गुन्हयासाठी वापरलेले साहीत्य जसे की, मोबाईल हँडसेट, वेगवेगळे कंपनीचे सिमकार्ड, वेगवेगळे बँकांचे क्रेडीट व डेबीट कार्ड हस्तगत करण्यात आले आहे.

**गुन्हा करण्याची पध्दत**

मागील एक वर्षापासुन सदरील इसम नामे उत्सवकुमार चंदुभाई भेसानिया, ऋषिकेश शिवनाथ भागवत, अनुराग भाऊसाहेब घोडके यांनी स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी क्रिप्टो व युएसडीटी. सारख्या भारतात बंदी असलेल्या व्हर्च्युअल चलनाचे बेनामी व्यवहार करण्यासाठी...

- अनोळखी इसमांच्या आधारकार्ड, पॅनकार्ड इ. कागदपत्रांचा परस्पर वापर करुन,
- वेगवेगळया नावाने वेगवेगळया बँकेमध्ये खाते उघडुन,
- बँक खातेला मोबाईल क्रमांक लिंक करण्यासाठी दुस-यांचे नावाचे वेगवेगळे सिमकार्ड वापरुन,
- बँक खात्यावरुन परस्पर आर्थिक व्यवहार करुन सदरचे खात्यांचा गैरवापर केल्याचे निष्पन्न झाले आहे.

Scanned with Cam

दहशतवाद विरोधी शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र आनंदराव बनसोडे यांचे फिर्यादीवरून नमुद गुन्हा दाखल असून पूढील तपास मा.पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गिता बागवडे हया करीत आहेत. वर नमुद तिन्ही अटक आरोपींना मा.न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने दिनांक 15/09/2024 पावेतो पोलीस कोठडी सुनावली आहे. गुन्हयाचा अधिक तपास सुरू आहे.

सदर संपुर्ण कार्यवाही मा. प्रविण पवार, पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. प्रशांत स्वामी यांचे मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. संभाजी पवार, पोलीस निरीक्षक, वाहतुक शाखा छावणी विभागाचे श्री. अशोक भंडारे, दहशतवाद विरोधी शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र बनसोडे, आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मोसीन सय्यद, सायबर पोलीस स्टेशनचे कदिर देशमुख, सहा.पोलीस निरीक्षक, तसेच दहशतवाद विरोधी शाखा, आर्थिक गुन्हे शाखा, सायबर पोलीस स्टेशनचे अंमलदार यांनी केलेली आहे.

11/9/24

( राजेंद्र बनसोडे )
सहाय्यक पोलीस निरीक्षक,
दहशतवाद विरोधी शाखा, छत्रपती संभाजीनगर.

Scanned with Cam